पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०३५ दि. २०/०९/२०१९**

## चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन पुणे शहर
## नवरात्र उत्सवाचे अनुषंगाने केले मार्गदर्शन

दि. १६/०९/२०१९ रोजी आगामी नवरात्र उत्सवाचे अनुषंगाने चतुःश्रृंगी मंदीराची पहाणी करुन कम्युनिटी पोलीसींग अंतर्गत मंदीर येथे ट्रस्टी यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत मा. अनिल शेवाळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन यांनी उपस्थित ट्रस्टी यांना नवरात्र उत्सवाच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले यामध्ये १.. नवरात्र उत्सव काळात मंदीर, मंदीर परिसर, समोरील रोडवर सीसीटीव्ही कॅमेरे लावुन कव्हर करण्यात यावा. जेणेकरुन मोबाईल चोरी, पाकिट चोरी, रोखता येईल तसेय यावर्षी भिकारी मुक्त नवरात्र उत्सव साजरा करणार आहोत. २. नवरात्र उत्सव काळात २४७ दिवस अग्निशमन व ॲम्ब्युलन्स हजर ठेवावी. ३.नवरात्र उत्सव काळात महिला करीता वेगळी व पुरषांकरीता वेगळी दर्शन रांग करण्यात यावी. ४.नवरात्र उत्सव काळात मंदीर परिसरात कोणत्याही प्रकारचे वाहन येणार नाही याची दक्षता घ्यावी. ५. नवरात्र उत्सव काळात मंदीर गाभा-यात चेंगराचेंगरी होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. ६.नवरात्र उत्सव काळात मंदीर परिसरात मंडप लाईट चे काम करणारे कर्मचारी २४ तास हजर असावेत. ७. नवरात्र उत्सव काळात मंदीर परिसरात असणा-या आस्थापना यांना सिलेंडर गॅस वापरण्यास बंदी घालण्यात यावी. ८. नवरात्र उत्सव काळात जास्तीत जास्त महिला स्वयंसेवक नेमावेत. ९. नवरात्र उत्सव काळात देवीची पालखी मिरवणुकीच्या वेळी दर्शनासाठी भाविकांची गर्दी होते. त्यावेळी चेंगराचेंगरी होवु नये याची दक्षता घेण्यात यावी.

